

| वर्ष - 9 । अंक - 166 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)



पान 2 वरुन...

'पीएमआरडीए'चा अनधिकृत बांधकामांना दणका

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 11 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आमदार रोहित पवार यांचा खळबळजनक दावा

# अजितदादांच्या 'घातपात'चा संशय!

महाईन्यूज । मुंबई

**जित पवार यांच्या विमानाचा अपघात नव्हे तर घातपात झाला आहे, अशी आम्हाला दाट शंका वाटते. विमान अपघाताची चौकशी सीआयडीद्वारे न करता डीजीसीएसह परदेशातील अनुभवी संस्थांकडून करावी. विमान कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातलेली असताना भारतात परवानगी कशी दिली गेली. वैमानिक व्यसनी होता का ? असे विविध प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) प्रदेश सरचिटणीस आमदार रोहित पवार यांनी उपस्थितीत केले.**



### रोहित पवार यांनी उपस्थित केलेले प्रश्न

- १६ वर्षे जुने विमान अद्याप हवाई वाहतूक सेवेत कसे होते.
- विमान उड्डाण करण्याच्या स्थितीत होते का. त्याची तपासणी कुणी केली.
- युरोपात बंदी असताना देशात वाहतुकीला परवानगी कशी दिली गेली.
- अपघाताग्रस्त विमानाची देखभाल – दुरुस्ती कुठे केली जात होती.
- विमानात हवाई इंधन भरलेले कॅन होते का.
- विमानाची स्थिती सांगणारे ट्रान्सपॉन्डर बंद का होते.
- फॉरेन्सिकची टीम घटनास्थळी उशिराने का आली.

अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याच्या घटनेला तेरा दिवस उलटल्यानंतर रोहित पवार यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन सविस्तरपणे आपल्या शंका, आक्षेप उपस्थित केले. सर्व घटनाक्रम आणि त्यातील त्रुटी निदर्शनास आणून त्यांनी हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा गंभीर आरोप केला.

अजित पवार यांचा विमान प्रवास ऐनवेळी ठरविण्यात आला. नियोजित वैमानिक न येता अन्य वैमानिकांनी विमान उडविले. पहिल्यांदा बारामती विमानतळावर दृशमानता चांगली होती, ती नंतर कमी कशी झाली. वैमानिक सुमित कपूर यांना दारूचे व्यसन होते. त्यामुळे अनेकदा त्यांच्यावर कारवाई झाली होती, निलंबितही केले होते. तरीही व्हीएसआर कंपनीने त्यांना पुन्हा वैमानिक म्हणून का नेमले. त्यांची मानसिक स्थिती काय होती.

व्हीएसआर कंपनीचे लियरजेट ४५ हे विमान सोळा वर्षे जुने होते. इतके जुने विमान हवाई वाहतुकीसाठी योग्य होते का. मुंबईत २०२३ मध्ये याच कंपनीच्या एका विमानाचा अपघात झाला होता. त्या बाबतचा अहवाल अद्याप जाहीर करण्यात आला नाही. अपघातानंतर युरोपीय संघ विमान वाहतूक सुरक्षा एजन्सीने (ईएएसए) अपघाताचा अहवाल मागितला होता. तो अहवाल दिला नाही म्हणून ईएएसएकडून कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातली होती.

व्हीएसआरचा परवाना निलंबित करण्यात आला होता. त्यानंतरही भारतात कंपनीला हवाई वाहतुकीची परवानगी कशी देण्यात आली. याच कंपनीकडून राज्यासह देशातील अनेक मुख्यमंत्री आणि राजकीय नेत्यांना विमाने पुरविली जातात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने विमान कंपनीची चौकशी करावी. त्यांच्याकडील विमानाची दुरुस्तीचे काम कसे केले जाते. ते कोणाच्या मार्गदर्शनाखाली होते, याची चौकशी करण्याची गरज आहे, असेही पवार म्हणाले.



### अनुभवी संस्थांकडून चौकशी व्हावी

विमान अपघाताची चौकशी सीआयडी आणि डीजीसीएच्या माध्यमातून चौकशी सुरू आहे. आमचा या संस्थांवर विश्वास आहे. पण, सीआयडीला अशा प्रकारच्या घटनांची चौकशी करण्याचा अनुभव नाही. त्यांचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. त्यांना विमानतळावर प्रवेश करण्याचाही अधिकार नाही. डीजीसीएसह फ्रान्सच्या नागरी विमान वाहतूक सुरक्षा तपासणी आणि विश्लेषण ब्युरो (बीईए) आणि ब्रिटनच्या विमान अपघात तपासणी शाखेकडून (एआयबी) चौकशी केली जावी. अपघातग्रस्त विमानाच्या ब्लॅक बॉक्सचे पूर्ण रेकॉर्डिंग कुटुंबातील किमान एका व्यक्तीला मिळाले पाहिजे. विमानाच्या कॉकपीटमधील संवाद पूर्णपणे उपलब्ध करून द्यावा. सध्या उपलब्ध असलेला संवाद सहवैमानिक कॅप्टन शांभवी पाठक आणि बारामती एटीसीच्या अधिकाऱ्यांमधील आहे.
मुख्य वैमानिक कॅप्टन सुमित कपूर यांचा सवांद समोर आला नाही. त्यामुळे त्यांची नेमकी स्थिती समोर यावी. विमान उतरविण्यासाठी बारामती विमानतळावरील २९ क्रमांकाची धावपट्टी सुरक्षित असतानाही ११ क्रमाकांच्या काहीशा धोकादायक धावपट्टीचा आग्रह का धरण्यात आला, असा प्रश्नही पवार यांनी उपस्थित केला.

### इच्छा नसतानाही सुनेत्रा पवार यांनी घेतली शपथ

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक प्रश्न आम्हाला पडले, शंका निर्माण झाल्या. पण, अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांना अशा शंका, संशय निर्माण झाला नाही. त्यांनी सत्ता जास्त महत्त्वाची वाटत होती. सत्तेत राहण्यासाठी त्यांची धडपड सुरू होती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची इच्छा नसतानाही त्यांना लगेचच शपथ घ्यायला लावली. त्यांना सत्ता जास्त महत्त्वाची वाटत असावी, अशी टिकाही त्यांनी नाव न घेता केली.

# ‘पीएमआरडीए’चा अनधिकृत बांधकामांना दणका

## सेक्टर ९, ११ सह भोरमधील होर्डिंग्जवर फिरवला बुलडोझर!

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मंगळवारी (दि. १०) अनधिकृत बांधकामांविरुद्ध धडक मोहीम राबवत, कारवाईचा बडगा उगारला. प्राधिकरणाच्या सेक्टर ९ आणि ११ मधील पत्राशेड्स, गॅरेजेस तसेच भोर तालुक्यातील अनधिकृत होर्डिंग्जवर ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सुमारे ४ हजार चौरस फूट बांधकाम पाडण्यात आले असून, अडीच एकर शासकीय जागा मोकळी करण्यात आली आहे.**

दि. १० फेब्रुवारी रोजी सेक्टर ९ मधील पत्राशेड, तसेच सेक्टर ११ मधील ४५ मीटर रस्त्यालगत असलेल्या गॅरेज आणि लेबर कॅम्पवर (कोठी) कारवाई करण्यात आली. वाहनतळासाठी आरक्षित जागेवर उभारलेली बेकायदेशीर पत्राशेड हटवून २.५ एकर क्षेत्र मोकळे करण्यात आले. या परिसरातील इतर टपरीचालक व वाहनतळधारकांना जागा तातडीने खाली करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

तसेच, भोर तालुक्यातील शिंदेवाडी येथेही ‘पीएमआरडीए’च्या पथकाने कारवाई केली. येथील श्री. पानसरे (गट क्र. ६०) यांची दोन होर्डिंग्ज, तसेच श्री. शिंदे (गट क्र. ६२, संस्कृती ॲडव्हर्टायझिंग) यांच्या अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई करण्यात आली. इतर बेकायदेशीर होर्डिंग्ज हटवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे.

सदर कारवाई महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे आणि दक्षता विभागाचे पोलीस अधीक्षक अमोल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या सहआयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील, उपायुक्त आशा होळकर, तहसीलदार रवींद्र रांजणे यांच्यासह नियोजन सहाय्यक व अभियंत्यांच्या पथकाचा सहभाग होता.



> परिसरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी ही मोहीम राबवण्यात आली आहे. नागरिकांनी आणि बांधकामधारकांनी पीएमआरडीएची रीतसर परवानगी घेऊनच बांधकामे करावीत, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> **- डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील,** सहआयुक्त, पीएमआरडीए.

PUNE METROPOLIS

# शरद पवार गटानेही NDA सोबत यावे : रामदास आठवले

**महाईन्यूज । पुणे**





**राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रुग्णालयात भेट घेवून तयांच्या प्रकृतीची विचारपूस केली. शरद पवार आणि त्यांच्या पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.**

शरद पवार यांना श्वास घेण्यास त्रास होवू लागल्याने त्यांना पुण्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सर्व तपासण्या करून त्यांना पाच दिवस उपचार करण्यासाठी रुग्णालयात ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर आज रामदास आठवले यांनी रुग्णालयात शरद पवारांची भेट घेतली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे पुणे शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, सरचिटणीस श्याम सदाफुले, नगरसेवक नीलेश आल्हाट, मोहन जगताप, जयदेव रंधवे, संघमित्रा गायकवाड, सोनूभाऊ निकाळजे, संतोष खरात, सनी अवसरमल, बुद्धीशा रंधवे, संग्राम खंगाळ, संजय बनसोडे, विक्की वाळके आदि मान्यवर उपस्थित होते.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, पवार साहेबांची प्रकृती सध्या चांगली आहे. हॉस्पिटल मध्ये असून देखील त्यांनी लोकसभा चालू आहे का? विचारलं त्यावर मी त्यांना लोकसभा चालू नाही मात्र राज्यसभा चालू असल्याचे सांगितले. पवार साहेबांची विल पवार खूप चांगली आहे. त्यामुळे लवकच बरं वाटेल.

पुढे बोलताना ते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांचा गट महायुतीमध्ये अर्थात राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सहभागी आहे. सध्याच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रीय काँग्रेस अजित पवार गट यांच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू आहे. शरद पवार यांनी या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी मध्ये समाविष्ट व्हावे, असे आवाहन रामदास आठवले यांनी केले आहे. असे झाल्यास आम्हाला आनंदच होईल. शरद पवार गट राष्ट्रीय लोकशाही आघाडीत समाविष्ट झाल्यास सुप्रिया सुळे यांच्या मंत्रीपदासकट सर्व अटींवर सकारात्मक प्रतिक्रिया उमटतील, अशी ग्वाही देखील आठवले यांनी दिली.

# आधुनिक शहरासाठी भाजपचे नवे सारथी

## महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर व पक्षनेते प्रशांत शितोळे

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयानंतर, शहराच्या वैभवात भर टाकण्यासाठी आणि विकासाची गंगा घराघरांत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टी सज्ज झाली आहे. नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर आणि सभागृह नेते प्रशांत शितोळे यांचा आज मोरवाडी येथील भाजपा शहर मध्यवर्ती कार्यालयात जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला. हा सोहळा केवळ सत्काराचा नसून, आगामी पाच वर्षांच्या 'विकास पर्वाचा' शंखनाद ठरला आहे.**



शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडेय, विकास डोळस, माजी महापौर राहुल जाधव, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, कैलास सानप, कविता हिंगे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका तसेच कोअर कमिटीच्या सदस्य, भाजप पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रसंगी, राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सत्कारानंतर झालेल्या विशेष बैठकीत आगामी संघटनात्मक कार्यक्रम आणि विकासकामांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या सोहळ्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला असून, शहराच्या राजकारणात भाजपची पकड अधिक मजबूत झाल्याचे दिसून येत आहे.

### हा विजय कार्यकर्त्यांच्या घामाचा

शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले कि, "शहराध्यक्ष म्हणून मला अभिमान आहे की, आमच्या कार्यकर्त्यांनी एकजुटीने हा गड सर केला आहे. आज महापौर, उपमहापौर पदी विराजमान झालेले नेतृत्व हे जमिनीवरचे नेतृत्व आहे. केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारच्या योजना शहराच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणे हेच या पदाधिकाऱ्यांचे मुख्य लक्ष्य असेल. आगामी काळात पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वोत्तम शहर म्हणून ओळखले जाईल."

### महिला आणि युवकांचे सक्षमीकरण

उपमहापौर शर्मिलाताई बाबर म्हणाल्या कि, "शहरातील प्रत्येक महिला स्वतःला सुरक्षित आणि स्वावलंबी समजली पाहिजे, हेच माझे ध्येय आहे. महापालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावणे आणि आरोग्य सुविधा सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आम्ही विशेष योजना आखत आहोत."

### शहराचा सर्वांगीण कायापालट करणार

महापौर रवि लांडगे म्हणाले कि, "महापौर पद ही केवळ सत्ता नसून ती जनतेने दिलेली जबाबदारी आहे. पिंपरी-चिंचवडमधील २४ तास पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि स्मार्ट सिटी अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकल्पांना गती देणे हे माझे पहिले कर्तव्य असेल. अनधिकृत बांधकामे आणि शास्तीकराच्या प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्यासाठी आम्ही सरकारशी समन्वय साधू."

# स्वच्छ प्रशासनासाठी रवी लांडगे 'ॲक्शन मोड'वर

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता, गतिमानता आणि शिस्त आणण्यासाठी नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी ठोस पावले उचलली आहेत. महापालिकेच्या विविध विभागांत दीर्घकाळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तातडीने बदल्या करण्याचे आदेश महापौरांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिले आहेत.**





> महापालिका ही नागरिकांची सेवा करणारी संस्था आहे; अधिकारी आणि कर्मचारी कुठे किती काळ कार्यरत आहेत यावर निर्भर न राहता, प्रत्येक विभागात पारदर्शकता आणि गतिमानता असावी. आमचा उद्देश प्रत्येक नागरिकाची कामे वेळेत पारदर्शकपणे पूर्ण व्हावीत, यासाठी आम्ही कठोर पण न्याय्य पावले उचलत आहोत.
> - रवी लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

महापौर रवी लांडगे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महापालिकेच्या आस्थापनेवरील अनेक अधिकारी आणि कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच विभागात किंवा एकाच पदावर कार्यरत आहेत. यामुळे स्थानिक पातळीवर हितसंबंध तयार होऊन प्रशासकीय कामकाजात 'अर्थपूर्ण वाटाघाटी' आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घातले जात आहे. ही बाब महापालिकेच्या प्रतिमेसाठी अत्यंत घातक असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्थापत्य, पर्यावरण, नगररचना, बांधकाम परवाना, आरोग्य, वैद्यकीय, करसंकलन, भांडार आणि उद्यान यांसारख्या महत्त्वाच्या विभागांमध्ये कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, मुख्य लिपिक, लेखापाल, भांडारपाल तसेच इतर अनेक कर्मचाऱ्यांच्या बदल्या दीर्घकाळ झालेल्या नाहीत. काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळूनही नियमानुसार दुसऱ्या विभागात बदली न होता, विभागप्रमुखांच्या मर्जीने तेच जुन्या विभागात कायम ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोपही महापौरांनी केला आहे.

विभागप्रमुखांकडून आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना सोडण्यास होणारा विरोध आणि प्रशासनाकडून या विषयाकडे झालेले दुर्लक्ष याचा थेट फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. नागरिकांची कामे रखडत असून पारदर्शकतेला हरताळ फासला जात असल्याचे महापौर लांडगे यांनी ठणकावून सांगितले.

यामुळे एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असलेल्या सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने इतरत्र बदली करून प्रशासनात व्यापक फेरबदल करण्याचे स्पष्ट निर्देश महापौरांनी दिले आहेत. या विषयाचे गांभीर्य ओळखून तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल महापौर कार्यालयास सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी आयुक्तांना दिल्या आहेत.

महापौर रवी लांडगे यांच्या या निर्णायक भूमिकेमुळे महापालिकेतील 'कम्फर्ट झोन'मध्ये असलेल्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासनात शिस्त आणि पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.



## भूमिका

**भारत आणि युरोपीय समुदाय यांच्यातील मुक्त व्यापार करार हा केवळ द्विपक्षीय सवलतींचा करार नसून, भारताच्या जागतिक व्यापारातील स्थान अधिक दृढ करणारा धोरणात्मक निर्णय आहे. ९३ टक्के उत्पादनांना आयात शुल्कमुक्त प्रवेश मिळाल्याने भारतीय निर्यातदारांना युरोपसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट स्पर्धा करण्याची संधी मिळणार आहे.**

# भारत-युरोपीय समुदाय महाकरार!




पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही देशांची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर युरोपीय बाजारपेठेवर अवलंबून आहे. वस्त्रोद्योगातील निर्यातीतून मिळणारे परकीय चलन त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यावश्यक ठरते. GSP आणि GSP PLUS सवलतींमुळे हे देश दीर्घकाळ स्पर्धात्मक राहिले.

**भारताला मिळालेला प्राधान्यक्रम : समीकरणात मूलभूत बदल**

आतापर्यंत भारताला युरोपीय बाजारात असा प्राधान्यक्रम नव्हता. तरीही व्यापारात लक्षणीय वाढ झाली होती. आता अधिकृत मुक्त व्यापार करारामुळे भारतीय उत्पादनांची किंमत, उपलब्धता आणि विविधता या तिन्ही बाबींमध्ये निर्णायक फायदा मिळणार आहे. वस्त्रोद्योग हा तिन्ही देशांचा समान आधार आहे. भारताला मिळणाऱ्या सवलतींमुळे युरोपीय खरेदीदार भारताकडे वळण्याची शक्यता वाढेल. याचा थेट फटका पाकिस्तान व बांगलादेशच्या निर्यातीला बसू शकतो, विशेषतः कमी मूल्यवर्धित उत्पादनांच्या बाबतीत.

**बांगलादेशची वाढती असुरक्षितता**

बांगलादेशची निर्यात रचना मोठ्या प्रमाणावर वस्त्रोद्योगावर अवलंबून आहे आणि युरोप हा त्याचा सर्वात मोठा ग्राहक आहे. त्यामुळे बाजारपेठेतील वाटा कमी होणे हे बांगलादेशसाठी आर्थिकदृष्ट्या अधिक धोकादायक ठरू शकते.

**पाकिस्तानसमोरील वेगळे आव्हान**

पाकिस्तानला GSP PLUS चा लाभ मिळत असला, तरी मानवी हक्क व सुशासनासंबंधीच्या अटींवर सतत आंतरराष्ट्रीय दबाव आहे. भारताची वाढती उपस्थिती युरोपीय बाजारात पाकिस्तानसाठी स्पर्धेचे आव्हान अधिक तीव्र करणार आहे.

**प्राधान्यक्रम विरुद्ध गुणवत्ता : दीर्घकालीन वास्तव**

युरोपीय बाजारपेठेत टिकण्यासाठी केवळ सवलती पुरेशा नाहीत. गुणवत्ता, पर्यावरणीय निकष, कामगार हक्क आणि शाश्वत उत्पादन या घटकांना भविष्यात अधिक महत्त्व येणार आहे. या निकषांवर भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश तिन्हींनाच स्वतःला सिद्ध करावे लागेल.

**भारतासाठीही आव्हाने कायम**

महाकरारामुळे संधी वाढल्या असल्या, तरी युरोपीय बाजारपेठेतील कठोर नियमांचे पालन, पुरवठा साखळीतील सुधारणा आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता राखणे भारतासाठी अनिवार्य ठरणार आहे. अन्यथा अपेक्षित लाभ मर्यादित राहण्याचा धोका आहे. हा करार दक्षिण आशियातील व्यापार स्पर्धेला नवी दिशा देणारा आहे. भारत अधिक आक्रमकपणे जागतिक बाजारपेठेत उतरत असताना, शेजारी देशांना आपली निर्यात धोरणे पुनर्रचित करण्याची गरज भासणार आहे. भारत–युरोपीय समुदाय महाकरार हा भारतासाठी संधीचा टप्पा आहे, तर पाकिस्तान आणि बांगलादेशसाठी सावधानतेचा इशारा. जागतिक व्यापारात टिकून राहण्यासाठी सवलतींपेक्षा संरचनात्मक सुधारणा आणि मूल्यवर्धन हाच खरा मार्ग आहे.

## प्रासंगिक »

### इच्छांना अंत नसतो

***प्रजेच्या सुखासाठी सतत झटणारा राजा त्यांच्या वाढत्या इच्छांमुळे मानसिकदृष्ट्या आजारी पडला.***

कितीही प्रयत्न केले तरी प्रजेच्या अपेक्षांना अंत नव्हता. अनेक उपचार करूनही फरक पडला नाही, कारण आजार शरीराचा नव्हे तर मनाचा होता. हिमालयातील साधूंनी राजाला समजावले की मन चंचल असून इच्छांना कधीही समाधान मिळत नाही. जितक्या इच्छा पूर्ण केल्या, तितक्या नव्या अपेक्षा निर्माण होतात. खरे सुख सर्व काही देण्यात नसून इच्छांवर मर्यादा घालण्यात आहे. हे समजल्यावर राजाला आपली चूक कळली आणि तो मानसिकदृष्ट्या सावरला. पुन्हा तो त्याच नव्या जोशाने, नव्या उमेदीने कामाला लागला. प्रजेची काळजी आणि सुरक्षा याकडे संपूर्ण लक्ष केंद्रित केले. त्या नंतर राजा आणि प्रजा दोघे एकदम आनंदात राहू लागले.

**तात्पर्य :**

इच्छा अमर्याद असतात; त्यांना संपवता येत नाही, पण त्यांचे नियंत्रण आपल्या हातात असते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शंभर वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठत असताना, संघाच्या आतापर्यंतच्या प्रवासाचा, त्याच्या अस्तित्वाचा आणि समाजातील भूमिकेचा नव्याने, सखोल व चिकित्सक विचार होणे केवळ स्वाभाविकच नव्हे तर काळाची गरज ठरते.

# संघशताब्दी, सत्ता आणि आत्मपरीक्षण

संघाचे नाव घेताच समाजात दोन टोकाच्या प्रतिक्रिया उमटतात एकीकडे संघाला जातीय, फॅसिस्ट ठरवणारे टीकाकार आणि दुसरीकडे संघाला शिरसावंद्य मानणारे निष्ठावंत स्वयंसेवक. या दोन्ही टोकांवर उभे असलेले गट संघाचे तटस्थ मूल्यमापन करू शकत नाहीत. त्यामुळे संघाच्या शताब्दीनिमित्त सरसंघचालक मोहन भागवत यांनी देशातील चार महानगरांत विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी साधलेला संवाद महत्त्वाचा ठरतो.

या संवाद सत्रांत संघाचा इतिहास, त्याची भूमिका आणि सध्याचे राजकीय-सामाजिक वास्तव यांवर प्रकाश टाकण्यात आला. पूर्वी संघाने बोलावले तरी अनेकजण प्रतिसाद देत नसत, तर आज विविध क्षेत्रांतील लोक उत्साहाने हजेरी लावत आहेत, हे निरीक्षण सरसंघचालकांनी नोंदवले. यामागचे कारण स्पष्ट आहे—आज संघविचार प्रेरित राजकीय शक्ती सत्तेत आहे. सत्ता हाताशी असल्याने संघाशी



जवळीक दाखवणे अनेकांसाठी फायदेशीर ठरत आहे. हे वास्तव संघ नेतृत्वाला माहीत आहे आणि त्याची जाणीव भागवतांच्या वक्तव्यातून दिसते.

भाजप आणि संघ यांच्यातील नात्यावर सरसंघचालकांनी केलेले विधान विशेष महत्त्वाचे ठरते. भाजपला अच्छे दिन संघामुळे आले, संघाला भाजपमुळे नाही हे वास्तव आज कोणीही नाकारणार नाही. भाजपच्या यशामागे संघ स्वयंसेवकांचे संघटन, कष्ट आणि जाळे आहे. इतर पक्षांकडे अशी शिस्तबद्ध आणि समर्पित संघटना उरलेली नाही, हाच भाजप आणि इतर पक्षांतील मूलभूत फरक आहे.

मात्र दुसऱ्या बाजूला, सिद्धांतशून्य राजकारण आणि भ्रष्टाचारावर सरसंघचालकांनी केलेली टीका अपुरी वाटते. भ्रष्टाचाराला केवळ समाज जबाबदार धरता येत नाही; राजकीय नेतृत्वाची जबाबदारी अधिक मोठी असते. संघविचारांशी संबंधित व्यक्ती आणि पक्षही या दोषांपासून पूर्णतः मुक्त नाहीत, हे मान्य करावे लागेल. भ्रष्टाचार रोखण्यासाठी केवळ नैतिक उपदेश नव्हे, तर मजबूत, तटस्थ नियामक संस्था आणि दोषींवर कठोर कारवाई आवश्यक आहे.

जर संघाला खरोखरच समाजपरिवर्तन घडवायचे असेल, तर आपल्या विचारांशी जवळीक असलेल्या सत्ताधाऱ्यांकडूनच या प्रक्रियेची सुरुवात करावी लागेल. तेव्हाच संघाचे समाजचिंतन प्रत्यक्षात उतरेल आणि शताब्दीपूर्तीला खरा अर्थ प्राप्त होईल.

## ।। अभंगवाणी ।।



अगत्य ज्या नरका जाणें । वीट मानणे कीर्तने ॥१॥
नावडेसा झाला बाप । आलें पाप वस्तीसि ॥ध्रु.॥

नारायण नाहीं वाचे । ते यमाचे अंदण ॥२॥
तुका म्हणे अभक्तासी । माता दासी जगझोडी ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कॉपी रोखण्यात बीडचा शिक्षण विभाग अपयशी

## बारावी परीक्षेत कॉपी पुरवतानाचे ड्रोन व्हिडिओ आले समोर

**महाईन्यूज । बीड**

**राज्यभरात बारावीच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. या परीक्षा कॉपीमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागानं कंबर कसली आहे. भरारी पथकं तर तैनात आहेतच, पण सीसीटीव्ही तसंच ड्रोनद्वारे देखील परीक्षा केंद्रांवर नजर ठेवली जात आहे. तरी देखील काही परीक्षा केंद्रावर कॉपी होत असल्याचं दिसून आलं आहे. शिक्षण विभागाच्या ड्रोन व्हिडिओमध्येच कॉपी होत असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळं कॉपी रोखण्यासाठी शिक्षण विभागाच अपयशी ठरल्याचं दिसून येत आहे.**



### दंडात्मक कारवाई करणार

"चौसाळा येथे घडलेला प्रकार चुकीचा आहे. मात्र, परीक्षा कॉलमध्ये कुणालाही कॉपी देता आली नाही. आम्ही सर्व सीसीटीव्ही चेक केले आहेत. विद्यार्थ्यांनी कॉपी केलेली नाही. विशेष करून त्या ठिकाणी पोलिसांबरोबरच बैठे पथक देखील होते. ज्यावेळेस हे ड्रोन फुटेज बाहेर आले, त्यावेळेस पोलिसांनी देखील त्या ठिकाणी असलेल्या पालकांना तिथून बाहेर काढलं. यानंतर असा अनुचित प्रकार झाल्यास त्यावर दंडात्मक कारवाई आम्ही करणार आहोत," असे स्पष्टीकऱण शिक्षण अधिकारी प्रिया राणी पाटील यांनी दिले.

### कॉपी पुरवल्याचे व्हिडिओ आले समोर

चौसाळा येथील आर्ट अँड सायन्स कॉलेजमध्ये काही नागरिक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे ड्रोन व्हिडिओ सध्या समोर आले आहेत. शिक्षण विभागानं प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, तरीदेखील काही नागरिक आपल्या पाल्यांना कॉपी पुरवत असल्याचा ड्रोन व्हिडिओ सध्या शिक्षण विभागानं जारी केला आहे. मात्र, या नागरिकांवर प्रशासन कशा पद्धतीनं कारवाई करतं हे पाहणं महत्त्वाचं आहे. अशा लोकांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या लोकांवर गुन्हे दाखल होतील का? हे देखील पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे. चौसाळा येथील कॉपीसंदर्भात शिक्षण अधिकारी प्रिया राणी पाटील यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

# ६२ हजार लाडक्या बहिणींना पात्र होण्याची संधी

**महाईन्यूज । मुंबई**

**पालघर जिल्ह्यातून सुमारे सव्वा सहा लाख महिला शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत पात्र झाल्या असल्या तरीही त्यापैकी ६२ हजार लाडक्या बहिणींनी या योजनेमध्ये अर्ज करताना शासकीय किंवा निमशासकीय सेवेत आपले नातेवाईक असल्याचे नमूद केले होते. अशा बहिणींना अपात्र होण्यापासून रोखण्यासाठी चुकून अथवा अनावधानाने नमूद केलेली माहिती बदलण्यासाठी राज्य सरकारने ३१ मार्चपर्यंत E-KYC सुधारणा करण्याची संधी दिली आहे.**



### हेल्पलाइन नंबर व्यस्तच

तालुका स्तरावरील बँका व ई सेवा केंद्र यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने ईकेवायसी यशस्वी झाली किंवा नाही याबद्दल महिलांना खात्री पटत नसते. आधार लिंक आणि बँक खाते सक्रिय असताना देखील केवळ ईकेवायसीच्या चुकीच्या माहितीमुळे सन्मान निधी थांबल्याबाबत महिलांच्या तक्रारी प्रलंबित आहेत. या संदर्भात स्वतंत्र हेल्पलाइन नंबर १८१ हा नेहमीच व्यस्त असल्याने यामार्फत महिलांना मदत मिळत नसून जिल्ह्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन नंबर निर्माण करणे अथवा तक्रार निवारण कक्ष उभारण्याची मागणी महिलांकडून पुढे येत आहे.

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात नारी शक्ती दूत या मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून पालघर जिल्ह्यातून दोन लाख ९६ हजार ५५० प्राप्त झालेल्या अर्जांपैकी दोन लाख ८५ हजार ८५७ अर्ज प्राप्त ठरले होते. तर योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात नवीन पोर्टल द्वारे झालेल्या नोंदणीमध्ये तीन लाख ४६ हजार ७८८ प्राप्त झालेल्या अर्जांपैकी तीन लाख ३८ हजार ८०२ अर्ज पात्र ठरले होते. अशाप्रकारे पालघर जिल्ह्यात दोन्ही योजनेअंतर्गत लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त झालेल्या सहा लाख ४३ हजार अर्जांपैकी सहा लाख २४ हजार ६५९ अर्ज (९७.१० टक्के) पात्र ठरले असून एकूण १८ हजार ६४६ अर्ज नामंजूर करण्यात आले होते.

दोन्ही योजनेत पात्र ठरलेल्या सव्वा सहा लाख अर्जांपैकी ६२ हजार पेक्षा अधिक लाडक्या बहिणींकडून अर्ज भरताना चुकीचे पर्याय निवडले गेले अथवा अर्ज भरताना तांत्रिक चुका झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या महिलांवर अपात्र ठरण्याची टांगती तलवार राहिली होती.

राज्य सरकारने ६ फेब्रुवारी रोजी निर्गमित केलेल्या एका शासन निर्णयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या लाभार्थी महिलांनी ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांची कुटुंबातील सदस्य नियमित, कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम मंडळ तसेच भारत सरकार अथवा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतन घेत आहे यासंदर्भात चुकीचा पर्याय निवडला आहे, अशा व्यक्तींना ३१ मार्चपर्यंत ऑनलाईन ई- केवायसी मध्ये सुधारणा करण्याची संधी देण्यात आलेली आहे. संबंधित महिलांनी असे केल्यास त्या या योजनेत पुन्हा पात्र ठरू शकणार असल्याने अशा महिलांना पुनश्च ईकेवायसी मध्ये सुधारणा करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

# बांगलादेशात मतदानाच्या ३ दिवस आधी हिंदू व्यावसायिकाची निर्घृण हत्या...

## दुकानात घुसून धारदार शस्त्राने हल्ला; एकाच ठिकाणी यापूर्वीही हिंदू व्यक्तीचा खून

महाईन्यूज । बांगलादेश

बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदू व्यक्तीची क्रूर हत्या करण्यात आली आहे. सोमवारी (०९ फेब्रुवारी) रात्रीच्या सुमारास अज्ञातांनी हिंदू व्यावसायिकाची हत्या केली. देशात संसदीय निवडणुकीचे वातावरण असताना सातत्याने हिंदू नागरिकांच्या होणाऱ्या हत्येच्या घटना चिंतेच्या विषय ठरल्या आहेत. मतदानासाठी तीन दिवस उरले असताना मायमेन जिल्ह्यात ही घटना घडली आहे.






### पोलिसांनी काय माहिती दिली?

मायमेन जिल्ह्यातील बाजाराच्या मध्यभागी सरकार यांची हत्या करण्यात आली. सोमवारी रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली. अज्ञातांनी सरकार यांना दुकानात गाठून धारदार शस्त्राने वार करत हत्या केली. हल्लेखोरांनी दुकानातून लाखो रुपयांची रोकड देखील लंपास केल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दुकानाचे शटर बंद करुन सरकार यांच्यावर हल्ला करण्यात आला, अशी माहिती पोलिसांनी एका इंग्रजी वृत्तपत्राला दिली. कुटुंबीयांना दुकानात रक्ताच्या थारोळ्यात पडलेला सरकार यांचा मृतदेह आढळून आला. सरकार यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले पण, त्यांना मृत घोषित करण्यात आले, असे पोलिस म्हणाले.

### एकाच ठिकाणी दोन हिंदूंची हत्या

सुशेन चंद्र सरकार (वय ६२) असे हत्या झालेल्या हिंदू व्यावसायिकाचे नाव आहे. सुशेन सरकार तांदूळ व्यापारी होते अशी माहिती समोर आली आहे. भाई भाई एन्टरप्राईसचे ते मालक होते. सरकार यांची हत्या करण्यात आली त्याच ठिकाणी यापूर्वी दिपू चंद्रा दास या हिंदू व्यक्तीची हत्या करण्यात आली होती. जमावाने अमानुष मारहाण करत दिपू चंद्राला ठार केले होते.

### सरकार यांचा मुलगा काय म्हणाला?

"आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून तांदळाचा व्यापार करत आहोत. आमच्याशी कोणाची दुश्मनी नव्हती. हल्लेखोरांना दुकानात वडिलांवर हल्ला करुन त्यांची हत्या केली. खून केल्यानंतर दुकानातून रोकड देखील चोरी केली, असे मृत सरकार यांचा मुलगा सुजान सरकार यांनी माहिती देताना म्हटले आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून, उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात ठेवण्यात आल्याचे सुजीत म्हणाले.

### ऑगस्ट २०२४ नंतर वाढल्या घटना

बांगलादेशध्ये केंद्रीय निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान होत आहे. मोहम्मद युनिस यांच्या अंतरिम सरकारमध्ये हिंदूंवर वाढते हल्ले चिंताजनक असल्याचे मत आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व्यक्त केले जात आहे. ऑगस्ट २०२४ नंतर हिंदूवरील हल्ल्यात वाढ झाली आहे. अल्पसंख्याक नागरिकांवरील हल्ले आणि देशातील लोकशाहीची मूल्ये यावरुन सवाल उपस्थित केला जात आहे. ऑगस्ट २०२४ पासून बांगलादेशमध्ये हजारो हिंदू नागरिकांवर जीवघेणे हल्ले करण्यात आले आहेत. यात अनेकांचा खून देखील झाला. भारताने बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांवरुन चिंता व्यक्त केली आहे.

# "बाबरी मशीद पुन्हा कधीच उभी राहणार नाही"

महाईन्यूज । उत्तर प्रदेश

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पुन्हा एकदा बाबरी मशिदीबाबत मोठे विधान केले आहे. 'बाबरी मिशीद पुन्हा उभी राहणार नाही, तो दिवस कधीच येणार नाही', असे वक्तव्य योगींनी केलं आहे. 'काही संधीसाधू लोक संकट समोर दिसल्यावर प्रभू रामाची आठवण काढतात. इतरवेळी त्यांना राम आठवत नाही, त्यामुळे प्रभू राम देखील त्यांना विसरले आहेत. प्रभू रामाचा द्वेष करणाऱ्यांना आता कुठे जागा उरली नाही', असे मुख्यमंत्री योगी म्हणाले आहेत.

### २०१७ नंतर परिस्थिती बदलली

"काही लोकांना विकसित भारताची संकल्पना पचत नाही. काही लोक कट रचण्याचे काम करतायेत. हा देश कधी कमजोर नव्हता. २०१७ च्या अगोदर उत्तर प्रदेशमध्ये सणांवर बंदी होती. महिला, मुली, मंदिर, विद्यालय सुरक्षित नव्हते. नागरिक सुरक्षित नव्हते. गरीबांच्या जमिनीवर कब्जा केला जात होता. कायदा हातात घेऊन त्याचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करेल त्याला त्याच्या सात पिढ्या लक्षात ठेवतील अशी शिक्षा दिली जाईल", असा सज्जड दम योगींनी भरला.



### कायदा तोडणाऱ्यांना दम

"भारतात कायद्यानुसार राहायला शिका. कायदे पाळले आणि नियमांने जगलात तर फायदा होईल. नाहीतर रस्ता कुठे जातो? कायदा तोडल्यास रस्ता थेट नरकात जातो. कायदा मोडून स्वर्गात जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांचे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही", असेही योगी आदित्यनाथ म्हणाले.

### योदी आदित्यनाथ काय म्हणाले?

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बारबंकी येथे एका जाहीर सभेला संबोधित करत होते. योगी म्हणाले की, "रामभक्तांवर गोळीबार करणाऱ्या या देशद्रोह्यांसाठी आता जागा उरलेली नाही. त्यांनी प्रभू रामाच्या कामात अडथळा निर्माण करत आहेत. बाबरी मशीद पुन्हा उभी राहिल असे स्वप्न पाहणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की तो दिवस कधीच येणार नाही." भारतात राहायचं असेल तर कायद्याने राहावं लागेल असा इशारा देखील यावेळी योगी आदित्यनाथ यांनी दिला.




# कॉफी शॉपमधील वेटरपासून 'डान्सिंग क्वीन'पर्यंत

आज बॉलीवूडमध्ये 'डान्सिंग क्वीन' म्हणून ओळखली जाणारी नोरा फतेही इथपर्यंत पोहोचण्यासाठी तिला प्रचंड संघर्ष करावा लागला. आज तिचा डान्स लाखो लोक पाहतात, पण एक काळ असा होता जेव्हा तिने पोटासाठी अक्षरशः एक अंड आणि एक चपातीवर दिवस काढले. कॅनाडामध्ये जन्मलेल्या नोरा फतेहीने लहान वयातच नोकरी सुरू केली होती. आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे अवघ्या 16व्या वर्षी ती काम करू लागली. सुरुवातीला तिने मॉलमध्ये सेल्स गर्ल म्हणून काम केलं. त्यानंतर कॉफी शॉपमध्ये वेटर म्हणूनही तिने नोकरी केली. इतकंच नाही तर नोरा टेलीकॉलर म्हणूनही काम करत होती. त्या काळात ती फोनवरून लॉटरीची तिकीट विकायची. या कामातून तिला पगारासोबत इन्सेन्टिव्हही मिळायचं. मात्र हे काम ती फक्त सहा महिनेच करू शकली. नोरा फतेही केवळ 5 हजार रुपये घेऊन भारतात आली होती. भारतात आल्यानंतर तिचं आयुष्य आणखी कठीण झालं. मुंबईत ती 9 जणांसोबत तीन बेडरूमच्या फ्लॅटमध्ये राहत होती. दोन मुलींसोबत एकाच खोलीत तिला राहावं लागायचं. त्या दिवसांची आठवण करताना नोरा अनेकदा भावुक होते. तिच्या सुरुवातीच्या काळात ती दिवसातून फक्त एक अंड आणि एक चपाती खायची. मिळणाऱ्या कामातून एजंट मोठा हिस्सा कापून घ्यायचे, त्यामुळे हातात फारसे पैसे उरत नव्हते.नोरा एका पारंपरिक कुटुंबातून येते. घरात डान्स करण्याला परवानगी नव्हती. त्यामुळे ती खोलीत लपून-छपून डान्सचा सराव करायची. ऑडिशनसाठी बाहेर जाताना हिंदी भाषा येत नसल्यामुळे तिला खूप अडचणी आल्या. अनेकदा लोक तिची थट्टा करायचे, वाईट कमेंट्स करायचे आणि त्यामुळे ती रडायचीसुद्धा. नोऱ्यासाठी 'बिग बॉस' हा शो आयुष्य बदलणारा ठरला. 'बिग बॉस 9' मध्ये वाइल्ड कार्ड एन्ट्रीनंतर तिची ओळख घराघरात पोहोचली. तिच्या डान्स परफॉर्मन्सने प्रेक्षकांची मनं जिंकली आणि त्यानंतर बॉलीवूडचे दरवाजे तिच्यासाठी खुले झाले. 'दिलबर', 'ओ साकी साकी', 'कमरिया' यांसारख्या गाण्यांनी नोऱ्याला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. विशेष म्हणजे तिने कुठलीही प्रोफेशनल ट्रेनिंग न घेता इंटरनेटवरील व्हिडिओ पाहून बेली डान्स शिकला. आज नोरा फतेही सोशल मीडियावरही खूप लोकप्रिय आहे. तिचा प्रत्येक डान्स व्हिडिओ व्हायरल होतो. संघर्ष, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.



# चांगला माणूस मिळाला तर लगेच लग्न करेन



अभिनेत्री मृणाल ठाकूर सध्या तिच्या आगामी 'दो दिवाने शहर में' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकत्याच दिलेल्या एका खास मुलाखतीत तिने प्रेम, लग्न आणि आयुष्याच्या जोडीदाराबद्दल मनमोकळेपणाने बोललं आहे. मृणाल म्हणते, "मला एखादा चांगला माणूस मिळाला, ज्याच्याशी माझं मन जुळेल आणि ज्याच्यासोबत सगळं सोपं वाटेल, तर मी नक्कीच झटपट लग्न करेन. मी लाल जोडा घालून नवरी होण्यासाठी तयार आहे." तिने हेही सांगितलं की तिचे आई-वडीलही आता नातवंडांसाठी तयार आहेत. आपल्या शालेय आठवणी सांगताना मृणाल म्हणाली की दुसरी ते सातवीत असताना तिला एका मुलावर खूप क्रश होता. पण ती खूप लाजाळू असल्यामुळे तिने कधीच आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत. नंतर वडिलांची बदली झाल्यामुळे तो किस्सा अपुरा राहिला. त्यानंतर तिचे क्रश थेट फिल्मी हिरोंवर गेले. मृणालने हसत सांगितलं की लहानपणी तिला ऋतिक रोशन, शाहिद कपूर आणि जॉन अब्राहम यांचं प्रचंड वेड होतं. त्यांच्या फोटोचे कटआउट्स ती पुस्तकांत लपवून ठेवायची. विशेष म्हणजे पुढे जाऊन तिला या तिन्ही अभिनेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली, ही बाब तिच्यासाठी स्वप्नपूर्तीच होती. लग्नाबद्दल बोलताना मृणाल म्हणाली, "पूर्वी मला वाटायचं आधी करिअर सेटल झालं पाहिजे, मग लग्न. पण आता मला कळलंय की लग्न योग्य वेळी होणं गरजेचं असतं." तिने स्पष्ट केलं की ती केवळ दबावामुळे लग्न करणार नाही, तर मनापासून तयार झाल्यावरच हा निर्णय घेईल.

# अनुष्का शर्माचा आनंद



वुमेन्स प्रीमियर लीग (WPL) 2026 चा अंतिम सामना झाला. हा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळवण्यात आला. या सामन्यात आरसीबीने दिल्ली कॅपिटल्सचा सहा विकेट्सने पराभव करत दुसऱ्यांदा डब्ल्यूपीएलची ट्रॉफी जिंकली. स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखाली आरसीबी महिला संघाने पुन्हा एकदा दमदार कामगिरी केली. या ऐतिहासिक विजयावर अभिनेत्री अनुष्का शर्मा हिनेही आनंद व्यक्त केला आहे. अनुष्का ही आरसीबीच्या पुरुष संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीची पत्नी आहे. अनुष्काने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर आरसीबी महिला संघ ट्रॉफी उंचावत असलेला फोटो शेअर केला. त्या फोटोसोबत तिने लिहिले, "आरसीबी महिला संघाने पुन्हा कमाल केली. इतिहास पुन्हा घडला." डब्ल्यूपीएलच्या चार वर्षांच्या इतिहासात आरसीबीने दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. याआधी 2024 मध्येही स्मृती मंधानाच्या कप्तानीत आरसीबीने ट्रॉफी जिंकली होती. आता 2026 मध्येही स्मृतीच्या नेतृत्वाखाली संघाने ही कामगिरी पुन्हा केली आहे. दरम्यान, अनुष्का शर्मा गेल्या काही वर्षांपासून चित्रपटांपासून दूर आहे. ती शेवटची 2018 मध्ये 'झिरो' या चित्रपटात दिसली होती. 'चकदा एक्सप्रेस' हा तिचा आगामी चित्रपट झूलन गोस्वामी यांच्या जीवनावर आधारित असून, त्याची शूटिंग पूर्ण झाली असली तरी तो अजून रिलीज झालेला नाही. सध्या अनुष्का तिच्या कुटुंबासोबत वेळ घालवत आहे.

# न्यूझीलंडचा युएईवर ऐतिहासिक विजय

## एकही विकेट न गमावता विजयाची नोंद; सेफर्ट-एलनची विक्रमी भागीदारी

**महाईन्यूज । मुंबई**

**न्यूझीलंड संघाने युएईचा पराभव करत टी-२० विश्वचषक २०२६ मधील सलग दुसरा विजय नोंदवला. न्यूझीलंडच्या सलीमीवीरांनी किवी संघाला एकही विकेट न गमावता १० विकेट्सने एकतर्फी विजय मिळवून दिला. युएईचे गोलंदाज फिन एलन व टीम सेफर्टच्या गोलंदाजीसमोर निष्प्रभ दिसत होते.**







न्यूझीलंड व युएई यांच्यातील सामना चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर झाला. न्यूझीलंडने युएईला पराभूत करत टी-२० विश्वचषकातील पहिला ऐतिहासिक विजय मिळवला, आजवर न्यूझीलंडने १० विकेट्स राखून कधीच विजयाची नोंद केली नव्हती. तर हा ऐतिहासिक विजय मिळवण्यासाठी फिन एलन व टीम सेफर्ट यांनी विक्रमी भागीदारी रचली.

युएईने दिलेल्या १७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडने एकही विकेट न गमावता सहज सामना आपल्या नावे केला. यादरम्यान टीम सेफर्ट २३ चेंडूत अर्धशतक तर फिन एलनने २६ चेंडूत अर्धशतक झळकावलं. यासह दोघांनी ९२ चेंडूत १७५ धावांची विक्रमी भागीदारी रचली. टीम सेफर्टने ४२ चेंडूत १२ चौकार व ३ षटकारांसह ८९ धावा केल्या. तर फिन एलनने ५० चेंडूत ५ चौकार व ५ षटकारांसह ८४ धावांची खेळी साकारली. यासह संघाने १५.२ षटकांत सहज विजयाची नोंद केली.

युएईने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. यासह युएईच्या फलंदाजांनी शानदार फलंदाजी करत १७३ धावांची चांगली धावसंख्या उभारली. संघाचा सलामीवीर अर्यांश शर्मा ८ धावांवर झेलबाद झाला. पण कर्णधार मूहम्मद वसीम नाबाद राहत संघाला चांगल्या धावसंख्येपर्यंत नेलं. वसीने ३४५ चेंडूत ४ चौकार व ३ षटकारांसह ६६ धावांची खेळी केली. तर अलिशान शर्फूने ४७ चेंडूत ५ चौकार व २ षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. तर खालच्या फळीत मयंक कुमारने २१ धावांचं योगदान दिलं. न्यूझीलंडकडून मॅट हेन्रीने २ विकेट्स घेतल्या तर जेकब डफी, लॉकी फर्ग्यूसन आणि मिचेल सँटरन यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

# आयुष म्हात्रेने घेतली मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची भेट

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय अंडर-१९ संघाने झिम्बाब्वे आणि नामिबीयात झालेल्या अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास घडवला आहे. आयसीसी अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये आयुष म्हात्रेच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघाने बलाढ्य इंग्लंडचा एकतर्फी पराभव केला आणि भारताला सहाव्यांदा अंडर-१९ वर्ल्डकपची ट्रॉफी जिंकून दिली. या विजयानंतर भारतीय खेळाडूंवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेचं देखील कौतुक होत आहे.**







आयुष म्हात्रेने भारतात परतल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची भेट घेतली. दरम्यान सचिनने त्याला खास गिफ्ट दिलं आहे. आयुष म्हात्रेने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे.या व्हिडीओमध्ये भारताचा दिग्गज फलंदाज सचिन तेंडुलकर आणि आयुष म्हात्रेसह संपूर्ण कुटुंब असल्याचं दिसून येत आहे. देशासाठी वर्ल्डकप जिंकणं ही अभिमानाची बाब आहे. दरम्यान या विजयाचा आनंद आणखी वाढला आहे. कारण आयुष म्हात्रेने क्रिकेटचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरची भेट घेतली. या भेटीदरम्यान सचिनने, शेवटच्या कसोटी सामन्यादरम्यान परिधान केलेली जर्सी साईन करून दिली आहे.

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. आरोन जॉर्ज स्वस्तात माघारी परतला होता. त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रेने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. वैभव सूर्यवंशीने अवघ्या ८० चेंडूत १७५ धावांची खेळी केली. तर आयुष म्हात्रेने ५१ चेंडूत ५३ धावांची खेळी केली. शेवटी अभिज्ञान कुंडूने ४० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ५० षटकांअखेर ९ गडी बाद ४११ धावांचा डोंगर उभारला.

भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ४१२ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडकडून कॅलेब फाल्कोनेरने ११५ धावांची खेळी केली. तर बेन डॉकिन्सने ६६ धावा केल्या. शेवटी बेन मेयसने ४५ धावा केल्या. पण इंग्लंडचा संपूर्ण डाव ४०.२ षटकात अवघ्या ३११ धावांवर आटोपला. हा सामना भारतीय संघाने १०० धावांनी आपल्या नावावर करून १०० धावांनी विजय मिळवला.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 10 फेब्रुवारी 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# “चिन्मय मिशन” पिंपरी-चिंचवडमध्ये यशस्वी!

## शिक्षण विश्व : तरुणाईत राष्ट्रसेवेची जोपासना आणि भगवद्गीतेतील मूल्यांचा प्रसार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**चिन्मय मिशनच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होण्याच्या निमित्ताने देशभर आयोजित करण्यात आलेली सुमारे २९५ दिवसांची “चिन्मय अमृत यात्रा” पिंपरी-चिंचवडमध्ये यशस्वीपणे पार पडली. या यात्रेचा मुख्य उद्देश तरुण पिढी आणि बालमनांमध्ये भगवद्गीतेतील मूल्ये रुजवणे तसेच राष्ट्रसेवेची भावना जागृत करणे हा होता.**




### अध्यात्म आणि आधुनिक तंत्रज्ञान...

पिंपरी-चिंचवडमध्ये पार पडलेल्या अमृत यात्रेत दिसून आले की अध्यात्म आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम तरुण पिढीपर्यंत मूल्ये पोहोचवण्यास प्रभावी ठरतो. AI-आधारित चित्रफिती आणि मोबाईल म्युझियमसारख्या नव्या माध्यमांमुळे पारंपरिक संदेश अनुभवात्मक आणि आकर्षक बनला. यामुळे भगवद्गीतेतील नैतिकता, राष्ट्रसेवा आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांची तळमळ तरुणांच्या मनात रुजली, ज्यामुळे भविष्यात समाजात सकारात्मक बदल घडवण्याची क्षमता वाढते.

गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांचा “राष्ट्रसेवा हीच ईश्वरसेवा” हा संदेश या यात्रेचा आत्मा ठरला. कार्यक्रमाला पद्मश्री श्री गिरीश प्रभुणे आणि श्री मनोज देवळेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच स्वामी प्रत्ययानंद, ब्रह्मचारिणी मैत्रेई चैतन्या आणि ब्रह्मचारिणी तारिणी चैतन्या यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात चिन्मय युवावीरांनी विविध महाविद्यालयांमध्ये प्रेरक प्रबोधन दिले, तर प्रा. नरेंद्र नायडू यांनी पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय AI-आधारित चित्रफितीमुळे उपस्थितांना स्वामी चिन्मयानंद यांच्याशी संवाद साधल्याचा अनुभव मिळाला.

स्वामी चिन्मयानंद यांच्या जीवनकार्यावर आधारित फिरते संग्रहालय (मोबाईल म्युझियम) देखील या यात्रेचा भाग होते, ज्याचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. विशेष आकर्षण ठरले बालविहारच्या मुलांचे भगवद्गीतेतील १५व्या अध्यायाचे सादरीकरण, ज्यामुळे उपस्थितांचे मन मंत्रमुग्ध झाले. चिन्मय मिशन पिंपरी-चिंचवडच्या वतीने सर्व मान्यवरांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार करण्यात आला. अध्यात्म, ज्ञान आणि उत्साह यांचा सुंदर संगम असलेला हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेला.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पीसीसीओईआरला पुरस्कार जाहीर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट ही केजी टू पीएचडी शिक्षण देणारी देशातील एक अग्रेसर शैक्षणिक संस्था आहे. पीसीईटीमध्ये आकुर्डी, रावेत आणि साते, वडगाव मावळ अशा तीन भव्य कॅम्पसचा समावेश आहे. यामध्ये शिशुवर्ग पासून डॉक्टरेट होण्यापर्यंत उच्च शिक्षण देणाऱ्या एकूण दहा संस्थांचा समावेश आहे. यामध्ये २०१४ साली रावेत येथे स्थापन केलेल्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रीसर्च (पीसीसीओईआर) या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा "उत्कृष्ट महाविद्यालय (व्यावसायिक कोर्स) पुरस्कार" जाहीर करण्यात आला आहे हे अभिमानास्पद आहे असे गौरवोद्गार पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी काढले.**




PCET's PCCOER
पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च

पीसीसीओईआर ला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा "उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार (व्यावसायिक कोर्स) २०२५-२६" जाहीर झाला आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.सुरेश गोसावी यांनी तसे पत्र महाविद्यालयाला दिले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान सोहळा विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये होणार आहे. रुपये १,५०,०००/-, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

याविषयी अधिक माहिती देताना पीसीसीओईआर चे संचालक, प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे कर्मवीर ॲड.बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये २०२५-२६ या वर्षासाठी "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार (व्यावसायिक अभ्यासक्रम) शहरी भाग" साठी पीसीसीओइआर ची निवड झाली आहे. यापूर्वी पीसीसीओइआर ला दोन वेळा 'एनबीए' (नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिशन) मानांकन तसेच आयएसओ प्रमाणपत्र प्राप्त आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत एआयसीटीइ, नवी दिल्ली आणि डीटीइ, मुंबई यांच्या द्वारे मान्यता मिळाली आहे. नॅक (३.५४) द्वारे 'ए++' दर्जा मिळाला आहे. पीसीसीओईआर मध्ये ४४ पीएचडी धारक आणि ५५ पीएचडी करणारे प्राध्यापक आहेत. अत्याधुनिक पायाभूत सुविधा, शिक्षण, संशोधन आणि नवीन उपक्रमांसाठी अनुकूल वातावरण असलेल्या पीसीसीओईआरने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पहिल्या पाच महाविद्यालयात स्थान प्राप्त केले आहे.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी पीसीसीओईआर च्या सर्व प्राध्यापक कर्मचारी वर्गाचे हा पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

### आतापर्यंत ४१९ पेटंट दाखल

या महाविद्यालयाने आतापर्यंत ४१९ पेटंट दाखल केले आहेत. ज्यामध्ये २८५ प्रकाशित, ५० मंजूर आणि ३ पेटंट यशस्वीरित्या व्यावसायिकृत सुरू झाले आहेत. १६ फेब्रुवारी २०१८ रोजी, एकाच दिवसात सर्वाधिक कॉपीराईट अर्ज दाखल करून या महाविद्यालयाने 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया' चे प्रमाणपत्र मिळवले आहे. तसेच १७ डिसेंबर २०१९ रोजी, एकाच दिवशी पेटंट दाखल करणाऱ्या पीसीसीओईआरच्या ३८ महिला प्राध्यापकांना देखील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया' ने मान्यता प्रमाणपत्र दिले आहे. उत्पादन विकास, नवीन उपक्रम, प्रकाशन, पेटंट आणि कॉपीराइट फायलिंग, इंक्युबेशन आणि उद्योजकता यावर आधारित प्रकल्प सादर करून उच्चशिक्षित संशोधक घडवणे यावर महाविद्यालय काम करीत असते. यासाठी नेहमीच विश्वस्त मंडळाचा पाठिंबा मिळत असतो.

# IIBM कॉलेजच्या ‘झेस्ट’ क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ

## कु. प्रतिक्षा डफळ यांना ‘झाशीची राणी’ पुरस्कार प्रदान

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**चिखली येथील आयआयबीएम (IIBM) कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट संस्थेच्या वार्षिक ‘झेस्ट’ क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी उत्साही वातावरणात संपन्न झाले. या उद्घाटन प्रसंगी संस्थेच्या विभागप्रमुख कु. प्रतिक्षा सुभाष डफळ यांना त्यांच्या मागील वर्षातील सर्वोत्कृष्ट व कौतुकास्पद कामगिरीबद्दल प्रियदर्शनी क्रीडा प्रतिष्ठान आणि G99 स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने ‘झाशीची राणी पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आले.**

मैदानावर क्रीडाज्योत अन् उत्साह

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रियदर्शनी क्रीडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण जाधव, G99 स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष गिरीश बिंजवे, ज्योती बडेकर, आर्यन मस्के, प्राचार्य प्रदीप फुलकर आणि विविध विभागप्रमुखांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मैदानावर क्रीडाज्योत फिरवून क्रीडांगणाचे पूजन केले. त्यानंतर मान्यवरांनी श्रीफळ वाढवून अधिकृतपणे सामन्यांना सुरुवात केली.




### आरोग्य आणि शिस्तीचा मंत्र

प्रमुख पाहुणे किरण जाधव यांनी विद्यार्थ्यांना फिटनेस आणि व्यायामाचे महत्त्व पटवून दिले. तर गिरीश बिंजवे यांनी “अभ्यासासोबतच आरोग्याची काळजी घेणे आणि जीवनात निटनेटकेपणा राखणे यशासाठी आवश्यक आहे,” असा मोलाचा संदेश दिला.

### पुरस्काराने गौरवल्याबद्दल अभिनंदन

कु. प्रतिक्षा डफळ यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य प्रदीप फुलकर, विभागप्रमुख अमोल भागवत, अनिकेत वंजारी, संदीप जाधव आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. संस्थेसाठी त्या ‘झाशीची राणी’च आहेत, अशा शब्दांत त्यांचे कौतुक करण्यात आले.

### विद्यार्थ्यांसाठी आठवडाभर खेळांची मेजवानी

हा क्रीडा महोत्सव पुढील आठ दिवस चालणार असून यात क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबॉल, डॉचबॉल, धावणे, रस्सीखेच, कॅरम, चेस आणि इलेक्ट्रॉनिक गेम्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत खेळाचा आनंद लुटला.

# डॉ. डी. वाय. पाटील फार्मसीचे ‘साईबाबा सेवाधाम’ येथे शिबीर

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (फार्मसी), आकुर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने मावळ तालुक्यातील साईबाबा सेवाधाम, कान्हे येथे विशेष हिवाळी शिबीर उत्साहात पार पडले. दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित या शिबिरामध्ये ५० स्वयंसेवकांनी ‘समाजसेवेचा जागर’ करत विविध उपक्रम राबविले.**



विविध सामाजिक उपक्रमांवर भर शिबिरादरम्यान स्वयंसेवकांनी सेवाधाम परिसराची स्वच्छता केली. विशेषतः किनारा वृद्धाश्रमाजवळ औषधी गुणधर्म असलेल्या शेवग्याच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. भविष्यात या वनस्पतीचा लाभ वृद्धाश्रमातील रहिवाशांना होणार आहे. यासोबतच पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ‘शोषखड्डे’ तयार करून जलसंवर्धनाचा महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

व्याख्याने आणि ऐतिहासिक वारसा संवर्धन विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी गीता होनराव यांनी “ध्यान आणि मानसिक आरोग्य” या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच, ऐतिहासिक बेडसे लेणी परिसरात स्वच्छता मोहीम राबवून प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक वारसा जपण्याबाबत जागरूकता निर्माण झाली.

> “विद्यार्थ्यांनी वृद्धांसोबत घालवलेला वेळ आणि त्यांनी केलेले निस्वार्थ श्रमदान खरोखरच कौतुकास्पद आहे. आजच्या धावपळीच्या युगात ज्येष्ठ नागरिकांना प्रेम, आपुलकी आणि संवादाची गरज असते. विद्यार्थ्यांनी आपला मौल्यवान वेळ काढून वृद्धांच्या सहवासात राहणे, त्यांचे अनुभव ऐकणे आणि दैनंदिन कामांमध्ये मदत करणे ही सामाजिक बांधिलकीची उत्तम उदाहरणे आहेत. अशा उपक्रमांमुळे वृद्धांना मानसिक आधार मिळतोच, पण विद्यार्थ्यांमध्येही संवेदनशीलता, माणुसकी आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होते.”
>
> -श्री. कुलकर्णी, व्यवस्थापक, किनारा वृद्धाश्रम

### मान्यवरांचे मार्गदर्शन

समारोप प्रसंगी किनारा वृद्धाश्रमाच्या संस्थापक प्रीती वैद्य म्हणाल्या की, “अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी भविष्यात जबाबदार व सुजाण नागरिक बनतील.” महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, “शिबिरातील हे अनुभव केवळ समाजसेवा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची शिदोरी आहे.”

# डॉ. डी. वाय. पाटील वराळे कॅम्पसचा जल्लोष

## कला, संस्कृती आणि सकारात्मक ऊर्जेचा संदेश देणारा उपक्रम

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**डॉ. सुशांत पाटील ग्रुपच्या डॉ. डी. वाय. पाटील वराळे कॅम्पसच्या विद्यार्थ्यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध मोक्याच्या ठिकाणी उत्स्फूर्त ‘फ्लॅशमॉब’ सादर करून नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. कला, संस्कृती आणि सकारात्मक ऊर्जेचा संदेश समाजात पोहोचवण्यासाठी या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**




### विविध ठिकाणी रंगला नृत्याचा आविष्कार

दसरा चौक (बाणेर), बालेवाडी हायस्ट्रीट, ग्रँड हायस्ट्रीट मॉल (हिंजवडी), संत ज्ञानेश्वर चौक (निगडी), दगडूशेठ हलवाई गणपती जवळील मंडई मेट्रो स्टेशन आणि निगडीतील भक्ती-शक्ती चौक या गजबजलेल्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी दमदार नृत्य सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या या ऊर्जावान परफॉर्मन्सला दाद देण्यासाठी प्रत्येक ठिकाणी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

### यशस्वी आयोजनात ‘यांचा’ पुढाकार

कार्यक्रमाच्या यशात क्रिएटिव्ह आणि कल्चरल डायरेक्टर श्रेयस देशपांडे यांच्यासह उन्मेष कोर्डे, मंगेश ढोले, तनय मत्तलवार, हेमंत पानसरे, जयेश, जय आणि राजू पासलकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. फ्लॅशमॉबमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेमार्फत विशेष कौतुक करण्यात आले आहे.

### मार्गदर्शन आणि सहकार्य

हा उपक्रम डॉ. सुशांत पाटील आणि ॲड. अनुजा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पाठिंब्यामुळे यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संचालक व प्राचार्य डॉ. सुरेश माळी, डॉ. मेघना भिलारे, डॉ. सुरेश शिरभाइुर्कर आणि डॉ. आर. टी. गोलगिरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### विद्यार्थ्यांचा उत्साह आणि संघभावना


उत्कृष्ट समन्वय, जबरदस्त आत्मविश्वास आणि जोशपूर्ण नृत्यामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. या उपक्रमातून संस्थेतील समृद्ध सांस्कृतिक वातावरण आणि विद्यार्थ्यांमधील एकीचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे आणि समाजात आनंदाचे वातावरण निर्माण करणे, हा यामागील मुख्य उद्देश होता.

# मोशी परिसरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरी आरोग्य धोक्यात

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मोशी प्राधिकरण परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून अत्यंत दूषित पाणीपुरवठा होत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्राधिकरणातील सेक्टर ४ ते १३, शिवाजीवाडी मोशी तसेच बोऱ्हाडेवाडी परिसरात महानगरपालिकेकडून पुरवण्यात येणाऱ्या पाण्याला तीव्र दुर्गंधी येत असून पाण्याचा रंगही पिवळसर असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.**





> “ मागील पंधरा दिवसापासून प्राधिकरणातील सेक्टर 4 ते 13 त्याचप्रमाणे शिवाजीवाडी मोशी, बोऱ्हाडेवाडी या ठिकाणी दूषित पाणीपुरवठा होत आहे. याबाबत वारंवार अधिकाऱ्यांशी संपर्क साधून देखील यामध्ये काहीही फरक पडलेला नाही. पुढील चार-पाच दिवसात हा पाणीपुरवठा शुद्ध आणि सुरळीत झाला नाही, तर फेडरेशनमार्फत आंदोलन करण्यात येईल आणि हेच पाणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना तिथे जाऊन पाजण्यात येईल.
>
> – संजीवन सांगळे, अध्यक्ष चिखली, पिंपरी–चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

या दूषित पाणीपुरवठ्यामुळे लहान मुले, वयोवृद्ध नागरिक, महिला तसेच इतर नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. हा प्रश्न थेट नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करणे गरजेचे आहे.

या संदर्भात चिखली–पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी महापालिका आयुक्त माननीय श्री. श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदन देऊन तातडीने शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

फेडरेशनकडून वारंवार पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधूनही कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. पुढील चार ते पाच दिवसांत पाणीपुरवठा व्यवस्थित झाला नाही तर फेडरेशनच्या वतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. आंदोलनादरम्यान हेच दूषित पाणी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पाजण्यात येईल, असा तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. या विषयाची माहिती आमदार महेश लांडगे, तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही देण्यात आली असून नागरिकांकडून प्रशासनाकडून तातडीच्या कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# THE EFFECT OF TECHNOLOGY ON STUDIES

**TECHNOLOGY HAS BECOME AN IMPORTANT PART OF MODERN EDUCATION. FROM ONLINE CLASSES TO DIGITAL BOOKS, STUDENTS NOW DEPEND HEAVILY ON TECHNOLOGY FOR LEARNING. IT HAS CHANGED THE WAY STUDENTS STUDY, MAKING EDUCATION MORE ACCESSIBLE AND INTERACTIVE THAN EVER BEFORE.**



Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE

When we see the effect of technology, we can understand the advanced technologies like smart screen, mobiles, AV aid /equipment are having many good positive impact. When we look at other side of coin, they are somewhere impacting in negative way also. So, it is important to make a balance between these two options wisely by the students as well as parents.

Technology helps students understand concepts better through videos, presentations, and educational apps. It also saves time and provides easy access to information. Students can clear their doubts quickly by using online resources, educational websites, and learning platforms. Technology also helps students improve skills such as typing, research, and problem-solving, which are important for their future. During exams and projects, technology helps students collect information, prepare notes, and revise topics effectively.




However, excessive use of mobile phones and social media can distract students from studies and reduce concentration. Spending too much time on games and entertainment can affect academic performance and health.

The negative effects of technology can be reduced by using it wisely. Students should set time limits for screen use and focus on educational content. Teachers and parents should guide students to balance technology with regular study habits.

In conclusion, technology has both positive and negative effects on studies. When used properly, it can improve learning and knowledge. Therefore, technology should be used as a helpful tool rather than a distraction in student's life.

**By – Visakha Kumari**
**Grade 7**